

अश्विनी भिडे
व्यवस्थापकीय संचालक, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन

# सुखकर, वेगवान, सुरक्षित...

**कुलाबा-वांद्रे-सीप्झ हा ३३.५ किमी लांबीचा मार्ग कुलाबापासून सीप्झपर्यंत २६ भूमिगत मार्गाद्वारे जोडला जाणार आहे. कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ मुळे कुलाबा, काळबादेवी, गिरगाव, महालक्ष्मी, वरळी, दादर, धारावीप्रमाणेच अंतरदेशीय आणि आंतरराष्ट्रीय विमानतळांप्रमाणेच, एमआयडीसी व सीप्झसारख्या औद्योगिकदृष्ट्या महत्त्वाची ठिकाणेदेखील जोडली जाणार आहेत.**

शहराचे नागरीकरण जितक्या झपाट्याने होत आहे तितक्याच झपाट्याने ग्रामीण भागातून शहराकडे होणारे स्थलांतर वाढले आहे, त्यात मुंबईकडे होणारे स्थलांतर म्हणजे सर्वपरिचित विषय. शहरांची लोकसंख्या वाढली की, नागरी सुविधांवर ताण पडणारच, समस्या या वाढणारच. सध्या मुंबईकरांना प्रकर्षाने भेडसावणारी समस्या म्हणजे येथील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवर दिवसागणिक वाढणारा ताण. मुंबईची उपनगरीय लोकल सेवा तसेच बेस्टची सेवा असूनही वाढत्या लोकसंख्येमुळे ही सेवा अपुरी पडत आहे. मुंबईकरांचा प्रवास सुखकर व्हावा यासाठी राज्य शासनाने १२ मेट्रो मार्ग उभारण्यास मान्यता दिली आहे. यांपैकी कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ हा मार्ग संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्ग आहे. भारतातील सर्वात जास्त लांबीचा संपूर्णतः भुयारी असलेला हा मेट्रो मार्ग २०२१ मध्ये कार्यान्वित झाल्यावर मुंबईतील वाहतुकीचे चित्र नक्कीच बदलेले दिसेल.

एकीकडे दहिसर (पश्चिम) ते डी एन नगर मेट्रो-२अ, डी एन नगर ते मानखुर्द मेट्रो-२ ब, वडाळा ते कासारवडवली मेट्रो-४, ठाणे-भिवंडी-कल्याण मेट्रो-५, स्वामी समर्थ नगर- जोगेश्वरी-कांजूरमार्ग-विक्रोळी मेट्रो-६, अंधेरी (पूर्व) ते दहिसर (पूर्व)) मेट्रो-७ हे सहा मेट्रो मार्ग राज्य शासन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत राबविले जात असताना कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो मार्ग-३ प्रकल्प मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे राबविण्यात येत आहे. हे सर्व मेट्रो मार्ग एकमेकांशी संलग्न असतीलच शिवाय मोनो व उपनगरीय रेल्वे मार्गालादेखील जोडले जातील.

संपूर्णतः भुयारी असलेल्या या मेट्रो मार्गाची अनेक वैशिष्ट्ये आहेत. हा मार्ग कफ परेड, कुलाबा, वरळी, बीकेसी, एमआयडीसी आणि सीप्झ अशा सहा विविध व्यावसायिक ठिकाणांना जोडतो व दक्षिण मुंबईपासून अंतरदेशीय आणि आंतरराष्ट्रीय विमानतळापर्यंत केवळ ५० मिनिटांत पोचवतो. शिवाय या मार्गामुळे १३ इस्पितळे, १२ शाळा, २१ महाविद्यालये, १४ धार्मिक स्थळे, ६ उद्याने, ३ कलादालने, १३ सिनेमा व नाट्य मंदिरे, ६ मोठी मैदाने व ६ क्रीडा संस्थांना भेट देणेसुद्धा शक्य होणार आहे. मेट्रो-३ मार्गावरून दररोज किमान १७ लाख मुंबईकर प्रवास करतील अशी अपेक्षा आहे. मोठ्या प्रमाणात उपलब्ध होणाऱ्या रोजगाराच्या संधी, शिवाय अनेक फायदे मेट्रो-३ मार्गामुळे मुंबईकरांना होणार आहे. हा मार्ग कार्यान्वित झाल्यावर जवळपास ६ लाख वाहने रस्त्यावरून कमी होणार असून १५ टक्क्यांनी उपनगरीय रेल्वेवरील ताण कमी होणार आहे.



आता थोडेसे कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ प्रकल्पाच्या दोन महत्त्वपूर्ण आणि बहुचर्चित विषयांबद्दल. प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या काळबादेवी व गिरगावच्या रहिवाशांचे पुनर्वसन आणि आरे कॉलनीत बांधण्यात येणारी कारशेड हे दोन्ही विषय निरनिराळ्या वर्गांतून अनेकार्थांनी चर्चिले गेले या अनुषंगाने काही मुद्दे पुन्हा एकदा स्पष्ट करणे आवश्यक आहे.

महत्त्वाचा प्रश्न पुनर्वसनाचा या प्रकल्पासाठी एकूण २८०० कुटुंबे बाधित होत असून आजपर्यंत मुं.म.रे.कॉ.तर्फे २५०० प्रकल्पबाधितांना पर्यायी जागा देण्यात आली असून त्यांना नव्या ठिकाणी स्थलांतरित करण्यात आले आहे. मेट्रो-३ मार्गावरील उर्वरित प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन मार्च २०१९ अखेर पूर्ण होईल. यापैकी गिरगाव, काळबादेवी येथील सुमारे ७५० कुटुंबांचे तात्पुरते स्थलांतरण करण्यात आले असून त्यांचे कायमस्वरूपी पुनर्वसन मूळ ठिकणीच करण्यात येणार आहे, तसेच पुनर्विकासाच्या इमारतींचे बांधकामदेखील ५ ते ६ महिन्यांत सुरू होणार आहे.

कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ प्रकल्पासाठीची कारशेड आरे कॉलनीतच बांधण्याचा हट्ट का, असा प्रश्न अनेकांनी केला, आजही करताहेत. एकीकडे आम्ही मेट्रोच्या विरुद्ध नाही, असे म्हणतानाच परिणामी नैसर्गिक व सामाजिक घडी मात्र किंचितही बिघडणं त्यांना मान्य होताना दिसत नाही. मुंबई एक आगळेवेगळे शहर आहे. तिच्या सामाजिक, भौगोलिक, आर्थिक, मूलभूत आणि पायाभूत गरजाही तितक्याच निराळ्या आहेत हे आपण लक्षात ठेवणे आवश्यक आहे. भारताची ही आर्थिक राजधानी आहे. त्यामुळेच मुंबईला विशेष दर्जा देऊन तिच्या गरजा भागवणे गरजेचे आहे. मेट्रोसाठी कारशेड हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. मेट्रो-३च्या ८ डब्यांच्या ३१ गाड्या इथे रात्री विश्रांतीसाठी थांबतील व दररोज सकाळी मेट्रो फेरी येथूनच सुरू होईल त्यामुळे सर्व उपलब्ध पर्यायांचा विचार तज्ज्ञांमार्फत करूनच या जागेची निवड झाली आहे. मा. उच्च न्यायालय व मा. हरित प्राधिकरण यांनीही त्यावर शिक्कामोर्तब केले आहे. ही जागा वनजमीन नसल्याचे पुन्हा पुन्हा सिद्ध झाले आहे. दुग्धविकास विभागाच्या या ३० हेक्टर जागेवरील २७०० झाडे यामुळे बाधित होतात हे खरे आहे. पण वृक्ष प्राधिकरणाच्या योग्य मंजुरीनंतर झाडे पुनर्रोपित करण्याची अथवा तोडण्याची कार्यवाही केली जाणार आहे. २५००० नवीन झाडांचे रोपण करण्यात आले असून सुमारे १५०० झाडांचे पुनर्रोपणही करण्यात आले आहे.

मेट्रो-३ मुळे ६ लाख ६५ हजारांहून अधिक वाहने रस्त्यावरून कमी होणार आहेत व त्यामुळे दररोज जवळपास ३ लाख लिटर इतक्या इंधनाची बचत होणार आहे. याचा किती चांगल परिणाम पर्यावरणावर होणार आहे हेसुद्धा आपण विसरून चालणार नाही. मेट्रो-३ ही पुढील किमान १०० वर्षांसाठी मुंबईतील वाहतुकीचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर सोडविणार असून दररोज १७ लाख प्रवाशांना घेऊन जाण्याची क्षमता असणारी ही व्यवस्था उभी न राहिल्यास पर्यावरणाचे नुकसान होईल हे विचारात घेणे महत्त्वाचे आहे.

मुंबई आगळी आहे. मुंबई देशाची आर्थिक राजधानी आहे. म्हणूनच तिची विशेष काळजी घेणे गरजेचे आहे. आजमितीला मुंबईतील नितांत गरज आहे ती मेट्रोची. या मेट्रोमुळेच नाहक बळी जाणारे जीव वाचवता येणार आहेत. मुंबईचे पर्यावरण सुधारता येणार आहे. मुंबईचा कोंडलेला श्वास मोकळा करता येणार आहे. मुंबई पुन्हा एकदा जिवंत करता येणार आहे. मुंबईचे हरवलेले वैभव परत मिळवता येणार आहे. आत्तापर्यंत असंख्य अडचणींवर मात करून मा. मुख्यमंत्री महोदयांच्या वॉररूमच्या मदतीने मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने १७.५ किमी लांबीचे भुयारीकरण अत्यंत सुरक्षितपणे पूर्ण केले असून सर्व २६ भूमिगत स्थानकांची कामे उत्तमपणे प्रगतिपथावर आहेत. सन २०२१ मध्ये मुंबईकरांच्या सेवेत ही मेट्रो आणण्यासाठी व मुंबईकरांचा प्रवास अधिक सुखकर, सुरक्षित आणि वेगवान करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. ■

